PRAVARA MEDICAL TRUST'S
आझादी का अमृत महोत्सव
# आयुर्वेद महाविद्यालय व श्री एकनाथ आयुर्वेद रुग्णालय
# AYURVED COLLEGE & SHRI EKNATH AYURVED RUGNALAYA

शेवगाव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)
Shevgaon, Dist. Ahmednagar (M.S.)
Pin Code - 414 502

- Tel. (02429) 295445, 9673004578
- Email : ayurcollege_shevgaon@yahoo.com
- web : www.ayurvedpravara.com

Ref. No. PMT/ACS/Ayu/ ऽ१० 	दिनांक - ०६/०८/२०२४

## सूचना

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की दिनांक **13** ऑगस्ट **2024** रोजी महाविद्यालयामध्ये अवयवदान दिनानिमित्त रांगोळी व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, तरी सर्व विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे.
पहिल्या तीन स्पर्धक विजेत्यांना पारितोषिके देण्यात येतील.

विषय –

1. गर्भ शारिर व **Embryology**
2. अस्थी व संधी शारिर
3. **Neuro Anatomy**
4. **Organ donation procedure and importance**

वेळ - सकाळी **10** ते **1**
दिनांक - **13** ऑगस्ट **2024**

### Rules and regulation for Rangoli competition

1. **Participants must bring their own colors and other essentials**
2. **2 hour and 30 minutes will be given for Rangoli making**
3. **Ensure your artwork aligns with the competition theme.**
4. **Participants must describe the theme of their Rangoli during the evaluation**

### Rules and regulation for Poster competition

1. **Poster should be original with white background**
2. **Mention the details of Title, Name of participants, Year, Name of the institute on right side lower corner**
3. **Title should be top of the poster**

PMT'S AYURVED COLLEGE SHEVGAON

प्राचार्य

सत्यमेव जयते

ROTTO SOTTO
gifting life
REGIONAL AND STATE ORGAN AND TISSUE TRANSPLANT ORGANISATION (MUMBAI)

# REGIONAL CUM STATE ORGAN AND TISSUE TRANSPLANT ORGANISATION WEST & MAHARASHTRA

### अवयवदान व उती (Tissue) दान काय आहे ?

जे रुग्ण एखादा अवयव कायम स्वरूपी निकामी झाल्याने मृत्युच्या उंबरठ्यावर आहेत व ज्यांना वेळेत अवयव मिळाला नाही तर ज्याचा मृत्यू होउ शकतो अशा गरजू रुग्णांसाठी मरणोत्तर आपले अवयव अथवा उती दान करुन त्यांना नवजीवनाची भेट देणे म्हणजेच अवयवदान करणे. अवयवदान हे अतिशय उदार कार्य आहे ज्यामुळे गरजू रुग्णांचे आयूष्य वाचते आणि बदलते. अवयवदानाने दरवर्षी लाखो रुग्णांचे प्राण वाचू शकतात.

अनेक उती देखील मृत्यूनंतर दान करता येतात. उतीदानाने रुग्णांच्या जगण्याचा स्तर बदलतो. जसे नेत्रदानाने **(cornea donation)** अंधाला दृष्टी मिळते. उतीदानाद्वारे पुनर्निर्माणाने कंकाल दोष दूर करता येतात व रुग्णांचे पुनर्वसन लवकर होते व वेदना कमी होतात.

### अवयव वा उती प्रतिरोपण म्हणजे काय ?

अवयव अथवा उती प्रत्यारोपणामध्ये एखादा स्वस्थ अवयव अथवा उती जिवंत अथवा मृत व्यक्तीच्या शरीरातून घेवून गरजू रुग्णांमध्ये रुढ व स्थापित अशा शस्त्रक्रियेद्वारे रोवला जातो.

### अवयव अथवा उतींचे दान कसे होत ?

अवयव अथवा उतींचे दान तीन प्रकाराने होते.

१. ब्रेन स्टेम डेथ म्हणजे मस्तिष्क स्तंभ मृत्यूनंतर होणारे दान. असा मृत्यू झालेल्या व्यक्ती या नेहमी अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरवर असतात.

२. हृदय बंद पडल्याने झालेल्या मृत्यूनंतरचे दान म्हणजेच जेव्हा हृदयाचे ठोके थांबतात व मृत्यू घोषित होतो, अशा मृत्यूनंतर फक्त उतींचेच दान होऊ शकते, जसे नेवदान व त्वचादान.

३. जिवंत व्यक्तींकडून होणारे दान,

जिवंत व्यक्ती आपल्या संमतीने अवयवदान आपल्या जवळच्या नातेवाईकाला अथवा गरजू रुग्णांना प्रेम व स्नेहभावाच्या भावनेने करु शकतात, वैद्यकीय शस्त्रक्रियेद्वारे एक मूत्रपिंड (कारण आपल्याला दोन मूत्रपिंड असतात). किंवा यकृताचा अथवा फुफुसाचा थोडा भाग दान करता येतो.

''व्हिप'' अथवा गुडघा बदलण्यासाठी केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियेत टाकून देण्यात येणाऱ्या अस्थि, बाळंतपणानंतर पडणारी वार अथवा गर्भोवेष्टन देखील दान करता येते.

### अवयवदान करण्यास कोण पात्र ठरु शकतो ?

नवजातकापासून ते वृद्धांपर्यंत सर्वांचेच अवयवदान होऊ शकते. अवयव प्रत्यारोपण करणारे डॉक्टर्स आधी दाता वैद्यकीय दृष्ट्या दान देण्यास योग्य आहे का याची तपासणी करतात. तसेच अवयव देखील प्रत्यारोपणासाठी स्वस्थ आहे याची तपासणी व चाचणी केली जाते मगच अवयवदान होते. तसे पाहता पुढे आपण बहुतेक सर्वजण संभाव्य दाते असतो.

### मृत्यूनंतर आपण कोणत्या अवयवांचे अथवा उतीचे दान करू शकतो ?

ब्रेन डेथ अथवा मास्तिष्क स्तंभ मृत्यू नंतर हृदय, फुफुसे यकृत, मूत्रपिंड, मोठे आतडे, प्लीहा अशा अवयवांचे दान होवू शकते.

मृत्यूनंतर हार्ट व्हॉल्व, हाड, टेंडन, लिगॅमेन्टस, स्किन व कॉर्निया यांचे दान होवू शकते.

अवयव व उती दान करण्याकरिता वेगवेगळया मर्यादा आहेत. ज्यावेळी विविध अवयवांचे व उतींचे एखाद्या ब्रेन डेथ झालेल्या मस्तिष्क स्तंभ मृत झालेल्या व्यक्तीकडून दान होत तेव्हा प्रथम अवयव काढले जातात व नंतर उतींचे दान होते. अवयव हे लवकरात लवकर गरजू रुग्णांमध्ये प्रत्यारोपित करणे गरजेचे असते. उती मात्र विविध काळापुरत्या साठवून ठेवता येतात.

एक अवयवदाता ८ जणांचे प्राण वाचवू शकतो. एक उती दाता साधारण ५०जणांचे आरोग्य सुधारु शकतो, कारण दान केलेल्या उती विविध आकारात कापून अनेक रुग्णांसाठी वापरता येतात.

### अवयवदानाच्या प्रक्रियेत किती वेळ लागतो ?

मृत्यूनंतर सुमारे ६ तासांच्या आत उतींचे दान होवू शकते. मस्तिष्क स्तंभ मृत्यू म्हणजेच ब्रेन डेथ घोषित केल्यानंतर हृदय थांबण्याच्या आत अंतर्गत अवयवांचे दान होवू शकते. ब्रेन डेड व्यक्तीचे हृदय साधारण ३६ ते ७२ तासापर्यंत कृत्रिमरीत्या चालू ठेवता येते. नातेवाईकांनी अवयवदानाला संमती दिल्यापासून त्यांना प्रिय व्यक्तीचे शव ताब्यात देण्यासाठी साधारण २४ तासाचा वेळ लागू शकतो. किती अवयवांचे दान होणार आहे, ते ज्या हॉस्पिटल मधील रुग्णांना पाठविण्यात येणार आहेत, त्याचे दात्याच्या रुग्णालयापासूनचे अंतर, त्या अवयवांच्या वितरणासाठी लागणारा वेळ, वैद्यकीय कायदेशीर प्रक्रिया यानुसार प्रत्येक दानासाठी लागणारा वेळ अवलंबून असतो. अवयवदात्याच्या नातेवाईकांनी संयम ठेवून सहकार्य करावे कारण त्यांच्या या उदात्त निर्णयामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचणार असतात.

### ब्रेन डेथ अथवा मस्तिष्क स्तंभ मृत्यू म्हणजे काय ?

एखाद्या व्यक्तीच्या मस्तिष्क स्तंभास **(Brain Stem)** कायमस्वरुपी इजा झाल्यास त्याला ब्रेन डेड घोषित करतात. ब्रेन डेड व्यक्ती स्वतःहून श्वास घेत नसतात व त्यांची चेतना ही परत येण्याची शक्यता नसते. कारण श्वास व चेतना या दोन्हींचे ही केंद्र ब्रेन स्टेम या मेंदूच्या महत्वाच्या भागात असते. परंतु, ब्रेन स्टेम डेड व्यक्तीला कृत्रीम श्वासोच्छवास व्हेंटिलेटरच्या सहायाने दिला जात असल्याने व इतर वैद्यकिय सहायाने त्याचे हदय साधारण ३६ ते ७२ तासापर्यंत चालू राहू शकते व अवयवांना रक्ताभिसरण सुरू असल्याने ऑक्सिजन मिळत राहतो. याच काळात जवळच्या नातेवाईकांच्या संमतीने हे अवयवदान होवू शकते. संभाव्य अवयवदाता हा व्हेंटिलेटरवरच असल्याने मस्तिष्क स्तंभ मृत्यू अथवा (ब्रेन स्टेम डेथ) हा फक्त मान्यताप्राप्त रुग्णालयातील अतिदक्षता विभागातच घोषित करता येतो.

### ब्रेन स्टेम डेथ अथवा मस्तिष्क स्तंभ मृत्यू कसा घोषित करतात ?

शासनाने मान्यता दिलेल्या चार डॉक्टरांची समिती ब्रेन स्टेम डेथ घोषित करते. या चार डॉक्टरांचा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेशी काही संबंध नसतो. काही न्यूरॉलॉजीकल प्रमाणित चाचण्या कमीत कमी ६ तासांच्या अंतरावर दोनदा करुन हे डॉक्टर्स ब्रेन डेथचे निदान करतात. राज्य शासनाने अवयव दानासाठी मान्यता दिलेल्या रुग्णालयातच ब्रेन स्टेम डेथ घोषित करता येते. व हे डॉक्टर ब्रेन डेड सर्टिफिकेटवर सही करतात. ब्रेन स्टेम डेथ घोषित करण्यासाठीच्या निकषांचा जगभर स्वीकार झाला आहे. ब्रेन डेड व्यक्तींच्या नातेवाईकांना अवयवदानानंतर मृत्यूचा दाखला दिला जातो.

### ब्रेन डेड घोषित केलेला व्यक्ती वाचण्याची अथवा जगण्याची काही शक्यता असते का ?

नाही. ब्रेन स्टेम डेड म्हणजेच मस्तिष्क स्तंभ मृत्यू झालेल्या व्यक्ती मृत असतो व तो जगण्याची काहीच शक्यता नसते.

ब्रेन स्टेम डेथचा ईच्छामरणाशी काही संबंध नाही. ब्रेन स्टेम डेथ व्यक्तींचे अवयव, त्यांची ब्रेन स्टेम डेथ म्हणजेच मस्तिष्क स्तंभ मृत्यू घोषित केल्यानंतरच घेतले जातात,

सर्वच कोमातले पेशंन्टस बेन स्टेम डेड नसतात. कोमातल्या पेशन्स्टचा बेन स्टेम बऱ्याचदा कार्यरत असू शकतो व त्याची चेतना परत येण्याची शक्यता असू शकते. ब्रेन स्टेम डेथ ही कोमाच्या पलिकडील अवस्था आहे, व त्यात व्यक्तीचा मृत्यू झाला असल्याने त्याची चेतना परत येण्याची शक्यता नसते. दात्याला हानी पोहचवून अवयवदान कधीच केले जात नाही.

### अवयव व उतींचे दान भारतात कायदेशीर आहे का ?

हो. भारतामध्ये अवयवदान हे मानवी अवयव व उती प्रतिरोपण कायदा १९९४ नुसार होते. त्या कायद्यामध्ये २०११ मध्ये दुरुस्ती करण्यात आली व २०१४ मध्ये या कायद्याचे नियम मंजूर झाले.

हा कायदा व नियम उपचारासाठी अवयव काढणे, साठविणे व त्यांचे प्रत्यारोपण करणे यासाठी नियम प्रदान करतात. अवयव विक्रि व खरेदीवर या कायद्याने आळा घातला आहे. तसेच या कायद्याने ब्रेन स्टेन डेथला मान्यता देवून ब्रेन स्टेम डेथ कशी घोषित करावी याची नियमावली पण दिली आहे.

### अवयवदानानंतर दात्याचे शरीर नातेवाईकांना परत दिले जाते का ?

हो. अवयवदानानंतर दात्याचे शरीर सन्मानपूर्वक नातेवाईकांना अंत्यविधीसाठी परत देण्यात येते. अवयवदान हे देहदानापेक्षा वेगळे आहे. देहदानात मृत व्यक्तीचे शरीर हे वैद्यकीय महाविद्यालयातील शरीर रचनाशास्त्र विभागाला दान दिले जाते, जेणेकरुन विद्यार्थी व डॉक्टर्स अभ्यास अथवा संशोधनासाठी त्या शरीराचा उपयोग करतात. देहदानात शरीर अंत्याविधीसाठी परत मिळत नाही.

### दान केलेले अवयव व उती फक्त श्रीमंतांना अथवा पैसेवाल्या रुग्णांनाच दिले जातात का ?

नाही. महाराष्ट्रात अवयवांची गरज असलेल्या रुग्णांची प्रतिक्षा यादी झोनल टान्सप्लान्ट कॉर्डिनेशन सेंटर या शासनमान्य संस्थेमार्फत राखली जाते.

या यादीत रुग्णाचे वय, रक्तगट, प्रतिक्षेचा कालावधी, रुग्णाची वैदानिक स्थिती या निकषांचा प्राधान्य ठरविताना विचार होतो.

अवयवांचे वितरण हे प्रतिक्षा यादीनुसार व दाता व रुग्ण यांच्यातील जुलणाऱ्या वैद्यकीय बाबीनूसार होते. रिजनल व स्टेटस ऑरंगन अंड टिश्यू ट्रान्सप्लान्ट ऑरगनायझेशन **(ROTTO-SOTTO)** या सरकारी संस्थेने महाराष्ट्रासाठी अवयवदान व अवयवांचे वितरण यासाठी मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत. अवयवांचे वितरण करताना रुग्णाचा सामाजिक, आर्थिक दर्जा व धर्म याचा विचार केला जात नाही. कृत्रीम व जैविकरीत्या देखील उती उपलब्ध असल्याने नेत्रपटत (कॉर्निआ) सोडल्यास उतींसाठी प्रतिक्षा यादी ठेवण्यात येत नाही.

### अवयवदात्याच्या नातेवाईकांना अवयव घेणाऱ्या रुग्णांचे नाते अथवा ओळख दिली जाते का ?

नाही. अवयव दात्याच्या नातेवाईकांना अवयव मिळालेल्या रुग्णाचे नाव व पत्ता सांगण्यात येत नाही. तसेच, अवयव मिळालेल्या रुग्णांना देखील अवयव दात्याचे नाव व नातेवाईकांचा पत्ता दिला जात नाही.

### अवयव व उतींचे दान केल्यानंतर दात्याच्या शरीराला काही विद्रुपता येते का ?

नाही. दात्याला ऑपरेशन थिएटरमध्ये घेऊन जावून शस्त्रक्रियेद्वारे अवयव काळजीपूर्वक काढले जातात. इतर कोणत्याही शस्त्रक्रियेप्रमाणे अवयव काढताना दात्याच्या पोटाला व जरुर त्या ठिकाणी चिर देवून अवयव काढले जातात टाके घालतात.

जेव्हा अवयवांबरोबर उतींचेही दान होत, तेव्हा पाय अथवा हात येथे देखील चिर द्यावी लागते परंतु, त्या जागी काळजीपूर्वक शिवण्यात येते त्यामुळे विद्रुपता येत नाही.

जर हातापायाची हाडे दान केली असतील तर हाडे काढल्यानंतर हात व पाय यांना आकार देण्यात येतो, ज्यामुळे शरीराला विद्रुपता येत नाही.

इतर कोणत्याही शस्त्रक्रियेप्रमाणेच दात्याच्या शरीरातून अवयव काढताना काळजी घेतली जाते. अवयव व उतींचे दान केल्यानंतर नातेवाईक शरीर अंत्यदर्शनासाठी ठेवू शकतात. व रीतसर अंत्यक्रिया ही करु शकतात.

### आपला धर्म अवयव दानाला संमती देतो का ?

हो. भारतातील सर्वच धर्म अवयव व उती दान हे चांगले कार्य समजतात कारण त्यामुळे अनेकांना नवजीवन मिळते.

### अवयवदान केल्यानंतर दात्याच्या नातेवाईकांना काही मोबदला मिळतो का ?

नाही. अवयवांचे व उतींचे दान हे एक परोपकारी व निस्वार्थी असे कार्य आहे, म्हणून अवयव दात्याच्या नातेवाईकांना कुठलाही आर्थिक मोबदला दिला जात नाही.

परंतु, अवयवदानाला संमती दिल्यानंतर व ब्रेन डेड घोषित केल्यानंतर अवयवदानासाठी केल्या जाणाऱ्या तपासण्या अथवा चाचण्या याचा खर्च दात्याच्या नातेवाईकांना उचलावा लागत नाही. ब्रेन डेड घोषित झाल्यानंतर नातेवाईकांची संमती मिळाल्यापासून ते अवयव काढेपर्यंत दात्याला लागणारा व्हेंटिलेटरचा खर्च देखील दात्याच्या नातेवाइकांना उचलावा लागत नाही.

मानवी शरीर अथवा त्याचा अवयव एखाद्या वस्तूप्रमाणे विकता अथवा विकत घेता येत नाही. मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ नुसार अवयव खरेदी अथवा विक्री कायद्याने गुन्हा आहे.

उतींवर केल्या जाणाऱ्या प्रक्रियेसाठी लागणारा खर्च अवयव वितरीत करताना उती घेणाऱ्या हॉस्पिटलला द्यावा लागतो,


### एखादी व्यक्ती अवयव व उतींचे दान कशाप्रकारे करू शकते ?

आपल्या मृत्युनंतर आपले शरीर हे आपल्या जवळच्या नावाईकांच्या ताब्यात असते व त्या शरीरावर जवळच्या नातेवाईकांचा अधिकार असतो. त्यामुळे अवयवदानासाठी त्यांची संमती अत्यावश्यक असते. जरी एखाद्या व्यक्तीने अवयवदानाचा फॉर्म अथवा कार्ड भरले असेल तरी जवळच्या नातेवाईकांचा निर्णय अंतिम असतो.

म्हणूनच आपला अवयवदानाचा निर्णय आपल्या नातेवाईकांना सांगणे व त्यांच्याशी चर्चा करणे महत्वाचे आहे. आपल्याला अवयवदान करणे का योग्य वाटते हे त्यांना जरुर सांगावे. अवयवदानामुळे अनेक जणांचे प्राण वाचू शकतात. कोणाच्या आयुष्यातील दुःख व त्रास कमी होऊन ते चांगल्या प्रकारे जगू शकतात. अवयवदानाचा संकल्प करताना आपल्या नातेवाईकांना जरुर सांगावे. एखाद्या आंधळ्याला दृष्टी, भाजलेल्या रुग्णाला नवजीवन नेत्र व त्वचादानाने मिळू शकते.

आपले मत नातेवाईकांना सांगून ठेवल्यास त्यांना दुःखाच्या मनस्थितीत निर्णय घेणे सोपे जाते. असे दिसून आले आहे की, दात्याने आपली अवयवदानाची इच्छा नातेवाईकांना आधीच सांगून ठेवली असेल तर ९६% नातेवाईक अवयव दानाला होकार देतात व सांगितले नसल्यास ५८% नातेवाईक अवयव दानाला होकार देतात असे दिसून आले आहे.

अवयवदानाचे कार्ड भरा व ते नेहमी जवळ बाळगा. अवयवदानाच्या कार्डावर कमीत कमी एका घरातल्या व्यक्तीची तरी सही घ्या.अवयवदानाने एक व्यक्ती आठ जणांचे आयुष्य वाचवू शकतो.




Donor forms and cards are available at the following addresses:

**Regional cum State Organ and Tissue Transplant Organisation (ROTTO-SOTTO)**
K.E.M. Hospital & G.S. Medical College,
New Building, 7th Floor, Acharya Donde Road,
Parel, Mumbai, 400012, Maharashtra.
**Email :** rottosotto.mumbai@gmail.com
**Telephone :**
+91 022 24107738 / 24107739, +91 7021932447

**National Organ and Tissue Transplant Organisation (NOTTO)**
**Website**: http://www.notto.gov.in
NOTTO Toll free helpline: 1800114770